हायरतर्फे जगातील पहिली डबल ड्रम तंत्रज्ञानाने युक्त वॉशिंग मशिन, ड्युओ-जेमिनी दाखल

- **भारतात नवीनच दाखल करण्यात आलेली हायर ड्युओ-जेमिनी मशिन दोन स्वतंत्र कार्यशील ड्रम्सने सुसज्जित; एकाच वेळी दोन स्वतंत्र वॉशिंगच्या सुविधेसह कपडे धुण्याच्या वेळेमध्ये बचत होण्यास मदत**

नवी दिल्ली/मुंबई, ×× सप्टेंबर, २०१६: होम अप्लायन्सेस ॲन्ड कन्झुमर इलेक्ट्रॉनिक्समधील जागतिक आघाडीची कंपनी आणि युरोमीटर इंटरनॅशनल सर्व्हे २०१५ नुसार सलग ७व्या वर्षासाठी* मेजर अप्लायन्सेसमधील जागतिक पहिला क्रमांकाचा ब्रँड, हायरने **भारतातील पहिल्याच डबल ड्रम वॉशिंग मशिनच्या दाखलीकरणाची घोषणा केली. हायर ड्युओ-जेमिनी ही जगातील पहिलीच ड्युअल-ड्रम वॉशिंग मशिन आहे, जी एकमेकांवर ठेवण्यात आलेल्या दोन फ्रंट-लोड वॉशिंग ड्रम्सने सुसज्जित आहे. ही नवीन वॉशिंग मशिन हायरची नवीनतम तांत्रिक इनोव्हेशन आहे, जी देशातील प्रिमिअम वॉशिंग मशिन रेंजला अधिक प्रबळ करते.**

शहरी व आधुनिक समकालीन परिवार आणि त्यांच्या विकसित होत असलेल्या जीवनशैली गरजांना लक्षात घेत, ड्युओ-जेमिनीमध्ये सर्वोत्तम कसब व तांत्रिक कौशल्यासह प्रिमिअम डिझाइनचे वैशिष्ट्य समाविष्ट आहे. मशिनमधील दोन वॉशिंग ड्रम्स परिवाराच्या कपडे धुण्याच्या विविध गरजांची पूर्तता करतात, ज्यामुळे कपडे धुण्याची प्रक्रिया अधिक कार्यक्षम होण्यासह त्यामध्ये वेळेची बचत सुद्धा होते.

दोन वॉशिंग ड्रम्सचे वैशिष्ट्य असलेली, हायर ड्युओ-जेमिनीमधील वरील भागातील ड्रममध्ये ४ किग्रॅ वजनापर्यंतचे कपडे सामावण्याची क्षमता समाविष्ट आहे, तर खालील भागातील ड्रममध्ये ८ किग्रॅ वजनापर्यंतचे कपडे सामावण्याची क्षमता समाविष्ट आहे. नवीन हायर ड्युओ-जेमिनी मशिनचे ग्राहकांना होणारे अद्वितीय लाभ म्हणजे रंग, फॅब्रिक किंवा इतर स्पेशल गरजांसंदर्भात युझर्सची चिंता दूर होते. उदाहरणार्थ, सफेद कपड्यांवरील रंगीत कपड्यांचे पडणारे डाग टाळण्याकरिता सफेद व रंगीत कपडे वेगवेगळे धुता येऊ शकतात, रेशमी किंवा सॅटिन कपडे वेगवेगळ्या ड्रममध्ये धुता येऊ शकतात किंवा तान्ह्या बालकांच्या कपड्यांना विशेष काळजी व दक्षतांची गरज असल्याने ते कपडे सुद्धा वेगवेगळे धुता येऊ शकतात. तसेच, आरोग्यविषयक स्वच्छतेच्या संदर्भात इनर वेअर कपडे सुद्धा वेगवेगळे धुता येऊ शकतात.

हायर ड्युओ-जेमिनी मशिन ड्युअल स्टार बॅलन्स सिस्टमने सुसज्जित आहे, जी ड्रम्सना स्थिरता व आवाजासंदर्भात शांतता (एका स्पिनवर ७० डेसिबलपर्यंतचा आवाज) प्रदान करते आणि मशिनमधील ड्युअल स्मार्ट ड्रायव्हिंग फोर्स सिस्टम कपड्यांना एकत्रित किंवा वेगवेगळे धुण्याकरिता महत्त्वपूर्ण नियंत्रण प्रदान करण्यासाठी मोटर्सवर विभिन्न वारंवारता परिवर्तन राखण्यामध्ये मदत करते. पिलो ड्रम टेक्नोलॉजीसह, मशिन स्वच्छ व सौम्य धुलाईसाठी पिलो आकाराच्या ड्रमची सुविधा प्रदान करते; जे ए एनर्जी प्रमाणित आहे. मशिनमध्ये इतर आकर्षक वैशिष्ट्ये समाविष्ट आहेत, जी समकालीन घरगुती कामांमध्ये महत्त्वाची भर करतात, जसे डिजिटल पॅनेलच्या माध्यमातून परिपूर्ण नियंत्रणासाठी १ टॉर्चने युक्त एलईडी स्क्रिन. ६ वॉटर इनलेट सिस्टम एका ड्रममधून दुसऱ्या ड्रममध्ये पाणी जाण्याला प्रतिबंध घालण्यासह शुद्ध व स्वच्छ वॉशिंग प्रदान करते. मशिन ३० अनुकूल प्रोग्रामिंग सुविधांनी (वरील भागामील ड्रममध्ये १२ आणि खालील भागातील ड्रममध्ये १८) सुद्धा सुसज्जित आहे.

याव्यतिरिक्त, हायर ड्युओ-जेमिनीमध्ये स्मार्टफोन्स व टॅब्लेट्सोबतच्या वाय-फाय कनेक्टिव्हिटीचे वैशिष्ट्य सुद्धा समाविष्ट आहे, जे युझर्सना वॉशिंग प्रक्रिया, वॉटर इनफ्लो/आऊटफ्लो आणि मशिनचे वॉशिंग कार्य यांवर देखरेख ठेवण्याची सुविधा प्रदान करते. मशिन ॲन्टीबॅक्टेरिअल फंक्शनने सुद्धा सुसज्जित आहे, जी ९९.८ टक्क्यांहून अधिक प्रमाणापर्यंत बॅक्टेरिया दूर करते. मशिन जवळपास ३० टक्क्यांपर्यंत वीज व पाण्याची बचत करण्यामध्ये मदत करते. मशिनमध्ये ॲन्टी-सॅटिन वैशिष्ट्य आणि नाईट वॉश वैशिष्ट्य सुद्धा समाविष्ट आहेत. याव्यतिरिक्त, हायर ड्युओ-जेमिनी वॉशिंग मशिन लाईफटाईम वॉरण्टीसह* उपलब्ध आहे.**

हायर ड्युओ-जेमिनी कोणत्याही स्क्रू किंवा डिझाईनमधील बदलांशिवाय सिंगल एकीकृत मशिनमध्ये सुरेखरित्या डिझाइन करण्यात आली आहे. मशिनमधील गोलाकार दरवाजाची डिझाइन फुलणाऱ्या फुलांच्या रँकप्रमाणे आहे आणि वॉशिंग प्रक्रिया स्पष्टपणे दिसण्याकरिता मशिनमध्ये प्रखर लाइट्स समाविष्ट आहेत. आतील भागातील सौम्य प्लॅटिनम ड्रमसह, मशिन उच्च दर्जाच्या क्लीनींगसह कोमल कपड्यांना अतिरिक्त केअर प्रदान करते. हायर ड्युओ मशिन तिच्या सुंदर डिझाइन व कार्यक्षमतेकरिता प्रतिष्ठित इफ प्रॉडक्ट डिझाइन अवॉर्ड २०१५ - जर्मनी (iF Product Design Award 2015 - Germany**)ची विजेती ठरली आहे.**

दाखलीकरणाप्रसंगी बोलताना, हायर इंडियाचे अध्यक्ष, श्री. एरिक ब्रेगांजा म्हणाले, ''भारत देश हा हायरसाठी प्रमुख धोरणात्मक बाजारपेठांपैकी एक राहिला आहे आणि आम्ही देशातील आमची वाढ व विकासाच्या दिशेने नेहमीच कटिबद्ध राहिलो आहोत. हायर ड्युओ-जेमिनीच्या दाखलीकरणासह, आम्ही शहरी व आधुनिक परिवारांच्या गरजांची पूर्तता करण्याकरिता देशातील आमची प्रिमिअम वॉशिंग मशिन्सची रेंज वर्धित करत आहोत. आधुनिक, जलदगतीने विकसित होणारे, तंत्रज्ञान प्रेमी ग्राहकांच्या गरजा लक्षात घेत, जे सदैव त्यांच्या वेळेची बचत करणाऱ्या सोल्यूशन्सचा शोध घेत आहेत, आम्ही भारतीय बाजारपेठेमध्ये ड्युओ-जेमिनी मशिन दाखल केली आहे. हे दाखलीकरण ग्राहक-केंद्रित इनोव्हेनशनच्या आमच्या ब्रँड वचनाला अधिक प्रबळ करण्यामध्ये आम्हाला मदत करते.''

नवीन हायर जेमिनी डबल ड्रम वॉशिंग मशिन १,६९,९९०/- रुपये किंमतीमध्ये प्रमुख मेट्रो शहरांमध्ये (दिल्ली, मुंबई, पुणे व बंगळुरु) उपलब्ध आहे.